0 2 SEP 2026

जनसपंक कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मराठी माणसाची अस्मिता जपणारे
# वर्तमान
ऐकत रहा mango FM 90.4
Postal Regd No : KLR/56/2024-2026
कोल्हापूर बुधवार दि.२ सप्टेंबर २०२६ • पाने ८ • वर्ष २६ • अंक १८ • e-mail: kopvartaman@gmail.com • RNI NO : MAHMAR/2001/06611 • किंमत ₹१

# विद्यार्थ्यांच्या अपेक्षा, आकांक्षांचे अभ्यासक्रमात रुपांतर होणे गरजेचे : प्राचार्य अनिल राव

कोल्हापूर/प्रतिनिधी :

विद्यार्थ्यांच्या अपेक्षा आणि आकांक्षांचे प्रतिबिंब अभ्यासक्रमात उमटून त्यांचे रूपांतर प्रत्यक्ष शिक्षणात झाले पाहिजे. विद्यार्थ्यांना विपय निवडीचे स्वातंत्र्य, बहुविपयांचे शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, इंटर्नशिप तसेच विविध माध्यमांतून क्रेडिट मिळविण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी-२०२०) अंमलबजावणी सर्व स्तरांवर प्रभावीपणे होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या 'एनईपी-२०२०' टास्क फोर्सचे अध्यक्ष प्राचार्य अनिल राव यांनी केले.



शिवाजी विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास आणि शिक्षणशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अभ्यास मंडळांचे अध्यक्ष, अधिविभागप्रमुख, प्रशासकीय अधिकारी यांच्यासाठी 'एनईपी-२०२०ची अंमलबजावणी आणि त्यामधील आव्हाने' या विपयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. अजय साळी, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अनिल राव यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधताना एनईपीच्या विविध पैलूंविपयी त्यांची मते जाणून घेतली. विपय निवडीतील लवचिकता, मल्टिपल एंट्री-एक्झिट, विद्यार्थी-केंद्रित शिक्षण, सर्वांगीण विकास, कौशल्याधारित व अनुभवाधारित शिक्षण, इंटर्नशिप आणि इंडियन नॉलेज सिस्टिम या विद्यार्थ्यांनी मांडलेल्या अपेक्षा प्रत्यक्षात आणणे हीच धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीची खरी कसोटी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एनईपीची अंमलबजावणी करताना विद्यापीठांनी पारंपरिक व कठोर चौकटींपलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना अधिकाधिक लवचिक पर्याय उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे सांगताना राव म्हणाले, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम, 'कॅफेटेरिया ॲप्रोच'द्वारे विपय निवडीचे स्वातंत्र्य, विविध संस्थांमधून क्रेडिट मिळविण्याची सुविधा, कौशल्य व ऑन-जॉब ट्रेनिंग, अप्रेंटिसशिप, मातृभापेतून शिक्षण आणि पूर्वज्ञानाला मान्यता अशा संधी विद्यार्थ्यांना मिळाल्या पाहिजेत. यासाठी अभ्यास मंडळांनी विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि बदलत्या जगाच्या गरजा समजून घेऊन अभ्यासक्रमांचे पुनरावलोकन करावे, तसेच शिक्षक व प्रशासकीय यंत्रणेने मानसिकतेतील पारंपरिक बंधने दूर करून प्रयोगशीलता स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी पुणे येथील रेझोनन्स आंत्रप्रिन्युअर अँड एम्प्लॉएबिलिटी सोल्युशन्सचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सिनारे यांनी विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये उपलब्ध असणाऱ्या कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधींविपयी सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, उच्चशिक्षणाचे लोकशाहीकरण हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असून, ते साध्य करण्यासाठी एनईपी-२०२०ची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. उच्चशिक्षणातील प्रवेशाचे प्रमाण २०३५ पर्यंत ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शाळेपासून उच्चशिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांची गळती रोखणे गरजेचे आहे. त्यासाठी 'स्कूल कनेक्ट'सारखे उपक्रम, बहुविपयांचे शिक्षण, मल्टिपल एंट्री-मल्टिपल एक्झिट, कौशल्याधारित शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्रित परीक्षा पद्धती यांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. एनईपीच्या अंमलबजावणीतील मोठे आव्हान हे केवळ प्रशासकीय नसून मानसिकता, धोरणाची समज आणि विविध संस्थांमध्ये आवश्यक असलेली सुसूत्रता हे आहे. त्यामुळे धोरणकर्ते, शिक्षक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कार्यशाळेपुरते मर्यादित न राहता त्यातील विचार प्रत्यक्ष शैक्षणिक व्यवहारात आणण्याची सामूहिक जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहनही डॉ. कामत यांनी केले.

शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी परिचय करून दिला. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, अभ्यास मंडळांचे अध्यक्ष, अधिकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

02 SEP 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या अपेक्षा, आकांक्षांचे अभ्यासक्रमात रूपांतर होणे गरजेचे: प्राचार्य अनिल राव

कोल्हापूर/प्रतिनिधी : विद्यार्थ्यांच्या अपेक्षा आणि आकांक्षांचे प्रतिबिंब अभ्यासक्रमात उमटून त्यांचे रूपांतर प्रत्यक्ष शिक्षणात झाले पाहिजे. विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य, बहुविषयांचे शिक्षण, कौशल्याधारित शिक्षण, इंटर्नशिप तसेच विविध माध्यमांतून क्रेडिट मिळविण्याच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी-२०२०) अंमलबजावणी सर्व स्तरांवर प्रभावीपणे होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाच्या 'एनईपी-२०२०' टास्क फोर्सचे अध्यक्ष प्राचार्य अनिल राव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास आणि शिक्षणशास्त्र अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने अभ्यास मंडळांचे अध्यक्ष, अधिविभागप्रमुख, प्रशासकीय अधिकारी यांच्यासाठी 'एनईपी-२०२०ची अंमलबजावणी आणि त्यामधील आव्हाने' या विषयावर आयोजित एकदिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. राजनीश कामत होते. प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, आंतरविद्याशाखा अधिष्ठाता डॉ. अजय साळी, कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

अनिल राव यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधताना एनईपीच्या विविध पैलूंविषयी त्यांची मते जाणून घेतली. विषय निवडीतील लवचिकता, मल्टिपल एंट्री-एक्झिट, विद्यार्थी-केंद्रित शिक्षण, सर्वांगीण विकास, कौशल्याधारित व अनुभवाधारित शिक्षण, इंटर्नशिप आणि इंडियन नॉलेज सिस्टिम या विद्यार्थ्यांनी मांडलेल्या अपेक्षा प्रत्यक्षात आणणे हीच धोरणाच्या यशस्वी अंमलबजावणीची खरी कसोटी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एनईपीची अंमलबजावणी करताना विद्यापीठांनी पारंपरिक व कठोर चौकटींपलीकडे जाऊन विद्यार्थ्यांना अधिकाधिक लवचिक पर्याय उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे सांगताना राव म्हणाले, बहुविद्याशाखीय अभ्यासक्रम, 'कॅफेटेरिया ॲप्रोच'द्वारे विषय निवडीचे स्वातंत्र्य, विविध संस्थांमधून क्रेडिट मिळविण्याची सुविधा, कौशल्य व ऑन-जॉब ट्रेनिंग, अप्रेंटिसशिप, मातृभाषेतून शिक्षण आणि पूर्वज्ञानाला मान्यता अशा संधी विद्यार्थ्यांना मिळाल्या पाहिजेत. यासाठी अभ्यास मंडळांनी विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि बदलत्या जगाच्या गरजा समजून घेऊन अभ्यासक्रमांचे पुनरावलोकन करावे, तसेच शिक्षक व प्रशासकीय यंत्रणेने मानसिकतेतील पारंपरिक बंधने दूर करून प्रयोगशीलता स्वीकारावी, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी पुणे येथील रेझोनन्स आंत्रप्रिन्युअर अँड एम्प्लॉएबिलिटी सोल्युशन्सचे व्यवस्थापकीय संचालक विवेक सिनारे यांनी विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये उपलब्ध असणाऱ्या कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधींविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. राजनीश कामत म्हणाले, उच्चशिक्षणाचे लोकशाहीकरण हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असून, ते साध्य करण्यासाठी एनईपी-२०२०ची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक आहे. उच्चशिक्षणातील प्रवेशाचे प्रमाण २०३५ पर्यंत ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी शाळेपासून उच्चशिक्षणापर्यंत विद्यार्थ्यांची गळती रोखणे गरजेचे आहे. त्यासाठी 'स्कूल कनेक्ट'सारखे उपक्रम, बहुविषयांचे शिक्षण, मल्टिपल एंट्री-मल्टिपल एक्झिट, कौशल्याधारित शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्रित परीक्षा पद्धती यांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. एनईपीच्या अंमलबजावणीतील मोठे आव्हान हे केवळ प्रशासकीय नसून मानसिकता, धोरणाची समज आणि विविध संस्थांमध्ये आवश्यक असलेली सुसूत्रता हे आहे. त्यामुळे धोरणकर्ते, शिक्षक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कार्यशाळेपुरते मर्यादित न राहता त्यातील विचार प्रत्यक्ष शैक्षणिक व्यवहारात आणण्याची सामूहिक जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहनही डॉ. कामत यांनी केले.



शिक्षणशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी परिचय करून दिला. डॉ. सुप्रिया पाटील यांनी सूत्रसंचलन केले. कार्यक्रमास परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॅ. अजितसिंह जाधव, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. सागर डेळेकर यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, अभ्यास मंडळांचे अध्यक्ष, अधिकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2026

पुण्यनगरी

# शैक्षणिक जीवनात सेट-नेट परीक्षेला महत्त्व : प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात सेट-नेट परीक्षेला अमूल्य महत्त्व असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू प्रा.डॉ. ज्योती जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित सेट परीक्षा ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, संचालक प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

या कार्यशाळेच्या पहिल्या दिवशीच्या सत्रांमध्ये सेट परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, प्रश्न सोडवण्याच्या पद्धती, वेळेचे नियोजन, संदर्भ साहित्याची निवड तसेच परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटकांवर, तसेच पेपर-१ मधील 'माहिती विश्लेषण' या विषयावर डॉ. शशिकांत अन्नदाते, 'संशोधन अभियोग्यता' या विषयावर डॉ. डॉ. कृष्णा पाटील, 'अध्यापन अभियोग्यता' या विषयावर डॉ. अन्नदाते आणि 'गणितीय युक्तिवाद आणि अभियोग्यता' या विषयावर डॉ. मारुती लोंढे यांनी मार्गदर्शन केले. स्वागत व प्रास्ताविक डॉ. कृष्णा पाटील, सूत्रसंचालन डॉ. सचिन भोसले यांनी केले. उपकुलसचिव विनय शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 SEP 2026
पुढारी

# शैक्षणिक जीवनात सेट-नेट परीक्षांना महत्त्व : डॉ. जाधव

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात सेट-नेटसारख्या परीक्षांना अमूल्य महत्त्व आहे. या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला व करिअरला नवी दिशा मिळते, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे आयोजित सेट परीक्षा ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्‌घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे व संचालक प्रा. डॉ. प्रतिभा पाटणकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यशाळेचे उद्‌घाटन झाले. डॉ. कृष्णा पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सचिन भोसले यांनी सूत्रसंचालन, तर उपकुलसचिव विनय शिंदे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2026

जनप्रवास

# 'विद्यार्थ्यांच्या जीवनात सेट, नेटला अमूल्य महत्व'

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात सेट, नेट परीक्षेला अमूल्य महत्व आहे, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू प्रा. डॉ. ज्योती जाधव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित सेट परीक्षा ऑनलाईन मार्गदर्शन कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. डॉ. विलास शिंदे, प्रा.डॉ.प्रतिभा पाटणकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ.जाधव म्हणाल्या, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनात सेट, नेट सारख्या परीक्षा आमूलाग्र बदल घडवत असतात. विविध विषयाच्या विद्यार्थ्यांनी सेट,नेट सारख्या परीक्षेच्या तयारीसाठी अभ्यासक्रमानुसार नोट्स तयार केल्या पाहिजेत. त्यासाठी ग्रंथालयातील विविध संदर्भ पुस्तके,ग्रंथ यांचा अभ्यास केला पाहिजे. प्रास्ताविक डॉ.कृष्णा पाटील यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2026
पुण्यनगरी

# संशोधन समाजोपयोगी असावे : डॉ. गुरव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

संशोधन केवळ पदवी संपादन किंवा शैक्षणिक प्रगतीपुरते मर्यादित न राहता समाजासाठी उपयुक्त, परिणामकारक आणि व्यवहार्य असावे. संशोधनातून निर्माण होणाऱ्या कल्पना बाजारपेठेच्या गरजा पूर्ण करणाऱ्या व स्वीकारार्ह असाव्यात, अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठाचा शिक्षणशास्त्र अधिविभाग आणि संशोधन व विकास कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने पीएम-उषा अंतर्गत पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी 'पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संशोधन कौशल्ये-गुणवत्तापूर्ण संशोधन आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचा पाया' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गुरव बोलत होते.

डॉ. गुरव म्हणाले, शिक्षण क्षेत्रातील नावीन्यपूर्ण कल्पनांचे समाजोपयोगी उत्पादनांमध्ये, सेवांमध्ये आणि उपक्रमांमध्ये रूपांतर करण्यासाठी संशोधकांनी प्रयत्नशील राहावे. संशोधनाला व्यावहारिक तसेच उद्योजकीय दृष्टिकोन देण्याची गरज असून, विद्यार्थ्यांनी केवळ संशोधन पूर्ण करण्याऐवजी त्यातून समाजाच्या प्रत्यक्ष गरजा कशा पूर्ण होतील, याचा विचार करावा. तर डॉ. चेतना सोनकांबळे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने संशोधनाच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य केले.

समन्वयक डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी कार्यशाळेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. डॉ. नीलिमा सप्रे, डॉ. राजेंद्र पारिजात आणि डॉ. कुंभार यांनी साधनव्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले. रुचिता थरोली यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2026
पुढारी

# समाज, बाजारपेठेसाठी संशोधन उपयुक्त असावे : डॉ. गुरव

**कोल्हापूर :** संशोधन केवळ पदवी संपादन किंवा शैक्षणिक प्रगतीपुरते मर्यादित न राहता समाजासाठी उपयुक्त, परिणामकारक आणि व्यवहार्य असावे. संशोधनातून निर्माण होणाऱ्या नावीन्यपूर्ण कल्पनांचे उत्पादन, सेवा आणि समाजोपयोगी उपक्रमांमध्ये रूपांतर होणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. राजाराम गुरव यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र अधिविभाग व संशोधन व विकास कक्षाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते. अधिविभागप्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे डॉ. नीलिमा सप्रे, डॉ. राजेंद्र पारिजात व डॉ. कुंभार यांनी मार्गदर्शन केले. डॉ. विद्यानंद खंडागळे समन्वयक होते. रुचिता थरोली यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुप्रिया पाटील यांनी आभार मानले.

02 SEP 2026

कुमारक्रांती

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सहकारी बँकिंग तळागाळातील अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा : महाव्यवस्थापक सर्वानन एम.

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सहकारी बँकिंग क्षेत्र भारताच्या तळागाळातील अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा आहे. ठेवीदारांचा विश्वास टिकवून ठेवणे आणि बँकेचे भविष्य सुरक्षित करणे हे मजबूत ट्रेझरी मॅनेजमेंट आणि पारदर्शक प्रशासन यांच्यावरच अवलंबून आहे, असे प्रतिपादन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पर्यवेक्षण विभागाचे महाव्यवस्थापक सर्वानन एम. यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र, कोल्हापूर डिस्ट्रीक्ट अर्बन बँक्स को-ऑपरेटीव्ह असोसिएशन लिमिटेड, कोल्हापूर आणि एसटीसीआय प्रायमरी डिलर्स लिमिटेड, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने व्यवस्थापन विकास कार्यक्रमांतर्गत 'फिक्स्ड इन्कम मार्केट्स इन इंडिया: करंट ट्रेंड्स, थीम्स अँड परस्पेक्टीव्हज् फॉर अर्बन को-ऑपरेटीव्ह बँक्स' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये करण्यात आले. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून सर्वानन एम. बोलत होते. कुलगुरू डॉ.राजनीश कामत अध्यक्षस्थानी होते.



महाव्यवस्थापक सर्वानन म्हणाले, गुंतवणूक धोरणाचे तंतोतंत पालन करणे, अंतर्गत लेखापरीक्षण मजबूत ठेवणे आणि आरबीआयच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करणे हे उच्च प्रशासनाचे मुख्य लक्षण आहे. देशामधील एकूण अर्बन को-ऑपरेटीव्ह बँकांपैकी जास्तीत जास्त बँका महाराष्ट्रात आणि त्यातही कोल्हापूर परिक्षेत्रात विस्तारलेल्या आहेत. भारत सरकारच्या वित्तीय धोरणांमधील सकारात्मक बदल आणि रिझर्व्ह बँकेच्या नवीन मार्गदर्शक तत्त्वांमुळे आज भारतीय फिक्स्ड इन्कम मार्केट एका अत्यंत महत्त्वाच्या वळणावर उभे आहे. गेल्या काही वर्षात भारतीय रोखे बाजार अधिक पारदर्शक आणि तंत्रज्ञानस्नेही झाला आहे. जागतिक घडामोडींमुळे बाँड यील्डमध्ये गतिमान बदल होत आहेत. यामध्ये आरबीआय महत्त्व-पूर्ण भूमिका पार पाडत आहे. को-ऑपरेटिव्ह बँकांसाठी केवळ वैधानिक तरलता प्रमाण पूर्ण करणे पुरेसे नाही, तर पोर्टफोलिओचे यिल्ड कसे वाढवता येईल, यावर भर देणे गरजेचे आहे. पारंपरिकरित्या अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांनी केवळ पैशांची बचत करणे पुरेसे नसून क्टिव्ह पोर्टफोलिओ मॅनेजमेंट करणे आवश्यक आहे. ठेवीदारांचा विश्वास आणि बँकेची नफाक्षमता वाढवण्यासाठी ट्रेझरी मॅनेजमेंटमधील 'सुरक्षा, तरलता आणि परतावा' या तिन्ही तत्त्वांचा समतोल राखणे अत्यंत गरजेचे आहे. हा कार्यक्रम फिक्स्ड इन्कम मार्केटमधील जोखीम ओळखण्यासाठी आणि नवीन संधीचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शक ठरेल.

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलगुरू डॉ.राजनीश कामत म्हणाले, अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांनी नेहमीच सर्वसामान्यांच्या, लहान व्यापाऱ्यांच्या आणि तळागाळातील घटकांच्या आर्थिक गरजा भागवण्यात मोठी भूमिका बजावली आहे. परंतु, आजचे बँकिंग केवळ ठेवी स्वीकारणे आणि कर्ज वाटणे यापुरते मर्यादित राहिलेले नाही. तंत्रज्ञान आणि बाजारातील साधने दिवसेंदिवस बदलत आहेत. या बदलांशी जुळवून घेणे आवश्यक आहे. बँकेच्या सर्व नियमांचे तंतोतंत पालन करणे ही केवळ कायदेशीर गरज नसून आपल्या बँकेच्या सुरक्षिततेचे कवच आहे.

केंद्राचे समन्वयक डॉ. सुभाष कोंबडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. एसटीसीआय संशोधन विभागाचे प्रमुख आदित्य व्यास यांनी आभार मानले. यावेळी आरबीआय (मुंबई) चे सहाय्यक महाव्यवस्थापक निलेश गावडे, उपाध्यक्ष आणि एसटीसीआयच्या प्रमुख संध्या शशी, एसटीसीआयचे सहाय्यक उपाध्यक्ष गुरुदत्त कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश शिंदे यांच्यासह कोल्हापूर जिल्ह्यातील सहकारी बँकांमधील व्यवस्थापकीय संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

02 SEP 2026

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लक्षवेधी | जुन्या इमारतींचे रूप, मांडणी मात्र नवी : क्वार्टर्सचा शैक्षणिक वापर : अध्यासने, प्रशिक्षण केंद्रांना मिळतेय चालना

# जुन्या क्वार्टर्सना ज्ञानकेंद्रांतून नवी ओळख

दामाजी जावीर, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील एकेकाळी प्राध्यापकांच्या निवासासाठी वापरल्या जाणाऱ्या क्वार्टर्स आता कात टाकत आहेत. बदलत्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन विद्यापीठ प्रशासनाने या ओस पडलेल्या इमारतींचे अध्यासने, प्रशिक्षण केंद्रे आणि विविध अभ्यासक्रमांसाठीच्या शैक्षणिक सुविधांमध्ये रुपांतर करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे मर्यादित वापरात असलेल्या इमारती आता विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी उपयोगात येऊ लागल्या आहेत. त्यामुळे या परिसराची स्वच्छताही नियमित होत आहे.

पूर्वी विद्यापीठ परिसरात वास्तव्यास असलेले अनेक प्राध्यापक आणि अधिकारी कालांतराने निवृत्त होऊन शहरात स्थायिक झाले. त्यानंतर अनेक क्वार्टर्स रिकामे राहिले होते. या जागा निष्क्रिय ठेवण्याऐवजी त्यांचा विद्यार्थ्यांच्या हितासाठी वापर करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. त्यातून काही इमारतींमध्ये अध्यासने सुरू झाली आहेत. काही ठिकाणी कौशल्याधारित प्रशिक्षण, प्रमाणपत्र अभ्यासक्रम, संशोधन उपक्रम आणि शैक्षणिक केंद्रे विकसित केली आहेत.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर कौशल्याधारित आणि बहुविषयक शिक्षणाला प्राधान्य दिले जात असताना, उपलब्ध पायाभूत सुविधांचा पुनर्वापर करण्याचा विद्यापीठाचा हा प्रयत्न महत्वाचा मानला जात आहे.

**■ कौशल्याधारित अभ्यासक्रमांना चालना, पायाभूत सुविधांचा परिणामकारक पुनर्वापर**







### हवामान बदलाच्या आव्हानांवर संशोधनाचे स्मार्ट केंद्र

जुन्या निवासी क्वार्टर्सपैकी बी-७ आणि बी-८ नंबरला कार्यरत असलेले हवामान बदल आणि शाश्वतता अभ्यास केंद्र हे आज हवामान बदल, पूर, दुष्काळ आणि पर्यावरणीय संकटांवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने संशोधन करणारे महत्वाचे ज्ञानकेंद्र बनले आहे. ऑक्टोबर २०२१ मध्ये स्थापन झालेल्या या केंद्राने अल्पावधीतच संशोधन क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. या केंद्राचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे आयओटी आणि जिओ इन्फॉर्मेटिक्स तंत्रज्ञानावर आधारित महाराष्ट्रातील पहिली रिअल-टाईम पूर देखरेख व अंदाज प्रणाली विकसित करण्याचे काम सुरू आहे. पूरस्थितीचा वेळीच अंदाज घेऊन प्रशासनाला इशारा देणे आणि संभाव्य नुकसान कमी करण्यासाठी हे संशोधन महत्त्वाचे मानले जात आहे. संशोधनासाठी केंद्रात रडार वॉटर लेव्हल सेन्सर्स, स्वयंचलित पर्जन्यमापक केंद्रे तसेच अचूक भू-सर्वेक्षणासाठी डीजीपीएस यांसारखी आधुनिक उपकरणे उपलब्ध आहेत. या उपकरणांच्या मदतीने पर्जन्यमान, नदीची पाणीपातळी, भूभागातील बदल आणि पर्यावरणीय माहितीचे अचूक संकलन व विश्लेषण केले जाते.

केंद्रामध्ये रिअल-टाईम पूर मॉडेलिंग, भूस्खलन संभाव्यता नकाशांकन, दुष्काळ मूल्यांकन व अंदाज, हवामान बदल परिदृश्य निर्मिती अशा महत्त्वाच्या विषयांवर संशोधन सुरू आहे. याशिवाय मशीन लर्निंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्या सहाय्याने पूर व हवामान बदलाचे विश्लेषण करणारे संशोधन निबंध आंतरराष्ट्रीय प्रसिद्ध होत असून विविध नवकल्पनांचे पेटंटही नोंदवण्यात येत आहेत. राष्ट्रीय जलविज्ञान संस्था, जम्मू तसेच इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ रिमोट सेन्सिंग, डेहराडून यांसारख्या नामांकित संस्थांशी या केंद्राचे शैक्षणिक सहकार्य आहे. विद्यार्थी इंटर्नशिप, कार्यशाळा, व्याख्यानमाला आणि धोरणकर्त्यांसाठी जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून हवामान [illegible] वैज्ञानिक दृष्टीकोन विकसित करण्याचे कार्यही हे केंद्र सातत्याने करत आहे.

**पर्यावरण संवर्धनासाठी केंद्राचे महत्वपूर्ण योगदान**

**हवामान बदलाच्या वाढत्या आव्हानांचा सामना करण्यासाठी विद्यापीठ सातत्याने संशोधनाला प्रोत्साहन देत आहे. या संशोधन केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थी, संशोधक आणि समाज यांना वैज्ञानिक माहिती, आधुनिक तंत्रज्ञान आणि शाश्वत उपाययोजना उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. समाजोपयोगी संशोधनातून पर्यावरण संवर्धनासाठी हे केंद्र महत्त्वपूर्ण योगदान देईल.**

■ **प्रा. डॉ. सचिन पन्हाळकर**, समन्वयक, भूगोल अधिविभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**सकारात्मक बदल पाहून आनंद**

**विद्यापीठाच्या निवासस्थानात आम्ही वर्षे वास्तव्यास होतो. या परिसराशी अनेक आठवणी आणि भावना जोडलेल्या आहेत. आता त्या ठिकाणी सकारात्मक बदल घडत असल्याचे पाहून आम्हाला आनंद होत आहे. अध्यासनाच्या या निर्णयामुळे निवासस्थानाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा आहे. आज विद्यापीठातील क्वॉटर्सच्या जागेचा शैक्षणिक आणि ज्ञाननिर्मितीसाठी उपयोग होत असल्याचे पाहताना आनंद होत आहे.**

■ **प्रा. डॉ. अशोक चौसाळकर**, माजी अधिविभागप्रमुख, राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 2 SEP 2026

कुमारक्रांती

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात २ सप्टेंबरला खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्ष सांगता समारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि आंतरभारती शिक्षण मंडळ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्ष सांगता समारंभ स्मृती व्याख्यान' कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वा. शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात आयोजित केले आहे.

समारंभाच्या उद्घाटन सत्रामध्ये 'वि. स.खांडेकर: सुवर्ण स्मरण' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत आणि मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर मांडणी करणार आहेत. या समारंभासाठी आंतरभारती शिक्षण संस्थेच्या कार्याध्यक्ष पल्लवी कोरगावकर, प्रा. सुनीलकुमार लवटे, डॉ. अतुल कापडी यांची प्रमुख उपस्थिती असेल. सत्राच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाच्या प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव असतील.

दुसऱ्या सत्रामध्ये 'वि. स. खांडेकरांच्या ग्रंथांवर चर्चा आणि ग्रंथ प्रकाशन' होणार आहे. या सत्राचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे असतील, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. मिलिंद जोशी (पुणे) उपस्थित असणार आहेत. या सत्रामध्ये प्रा. सुनिलकुमार लवटे यांनी संपादित केलेल्या ग्रंथांचे तसेच राम देशपांडे व नीलम माणगावे यांच्या ग्रंथांचे प्रकाशन होणार आहे. कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतीवर्ष विशेषांकाचे प्रकाशन करण्यात येईल. यामध्ये साधना साप्ताहिक (पुणे), दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका (कोल्हापूर), जडणघडण (पुणे), मेहता ग्रंथ जगत या अंकांचे प्रकाशन होणार आहे. यामध्ये विनोद शिरसाठ, प्रा. चंद्रकांत पोतदार, सागर देशपांडे, अखिल मेहता, भाग्यश्री पाटील, अमेय मेहता सहभागी होत आहेत. या सत्राचे अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार व संपादक डॉ. विजय चोरमारे असतील. तरी कार्यक्रमाचा लाभ रसिकांनी घ्यावा, असे आवाहन मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 SEP 2026
पुढारी

संक्षिप्त

# शिवाजी विद्यापीठात वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्ष सांगता समारंभ आज

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ मराठी अधिविभाग व आंतरभारती शिक्षण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'वि. स. खांडेकर सुवर्ण स्मृतिवर्ष सांगता समारंभ व स्मृती व्याख्यान' बुधवारी (दि. २) सकाळी साडेदहा वाजता विद्यापीठ राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. उद्घाटन सत्रात 'वि. स. खांडेकर : सुवर्ण स्मरण' या विषयावर ज्येष्ठ विचारवंत तथा मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. भालचंद्र मुणगेकर मार्गदर्शन करणार आहेत. आंतरभारती शिक्षण संस्थेच्या कार्याध्यक्ष पल्लवी कोरगावकर, प्रा. सुनीलकुमार लवटे, डॉ. अतुल कापडी यांची प्रमुख उपस्थिती असेल. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव असणार आहेत. दुसऱ्या सत्रात खांडेकरांच्या ग्रंथांवर चर्चा व ग्रंथ प्रकाशन होईल. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

02 SEP 2026

लोकमंथन

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डिजिटल पत्रकारांनी कायद्यांची जाण ठेवावी : डॉ. शिवाजी जाधव



सांगली / प्रतिनिधी : डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेता पत्रकारांनी बातमी देण्याच्या वेगासोबतच कायदेशीर बाबींचे भान ठेवणे आवश्यक आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रसिध्द होणाऱ्या प्रत्येक मजकुराची कायदेशीर जबाबदारी समजून घेऊन पत्रकारांनी काम करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन आणि अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने सांगली येथे पत्रकारांसाठी एकदिवसीय राज्यस्तरीय - कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विश्रामबाग येथील पोलीस मुख्यालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यशाळेस राज्यभरातून ३०० हून अधिक पत्रकारांनी सहभाग घेतला.

कार्यशाळेतील पहिल्या सत्रात डॉ. शिवाजी जाधव यांनी 'डिजिटल माध्यमांसाठी कायदेशीर तरतुदी' या विषयावर मार्गदर्शन केले. डिजिटल माध्यमांवर बातमी, छायाचित्र, व्हिडिओ किंवा अन्य माहिती प्रसिध्द करताना पत्रकारांनी कोणत्या कायदेशीर बाबींची काळजी घ्यावी, सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या जबाबदाऱ्या कोणत्या आहेत. तसेच पत्रकारितेतील निष्काळजीपणामुळे कायदेशीर अडचणी कशा निर्माण होऊ शकतात, याचे त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून विवेचन केले.

'बातमी सर्वप्रथम देण्याच्या स्पर्धेपेक्षा बातमी अचूक आणि कायदेशीरदृष्ट्या सुरक्षित असणे अधिक महत्त्वाचे आहे,' असे सांगत त्यांनी डिजिटल पत्रकारांनी माहितीची पडताळणी करूनच ती प्रसिद्ध करण्याचे आवाहन केले. सोशल मीडियावर एखादी माहिती मोठ्या प्रमाणात प्रसारित होत आहे म्हणून ती खरी असेलच असे नाही. त्यामुळे स्रोताची विश्वासार्हता तपासणे आणि आवश्यक त्या कायदेशीर बाबींचा विचार करणे ही पत्रकारांची जबाबदारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ पत्रकार विवेक वाघमोडे यांनी 'फेक न्यूज कशी ओळखावी?' या विषयावर मार्गदर्शन केले. सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांमुळे चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती वेगाने प्रसारित होत असून त्याचा परिणाम समाजाच्या विचार प्रक्रियेवर होऊ शकतो. त्यामुळे पत्रकारांनी व्हायरल संदेश, छायाचित्रे, व्हिडिओ आणि दावे यांची तथ्य पडताळणी करूनच त्यांचा बातमीसाठी वापर करावा, असे त्यांनी सांगितले.


फेक न्यूज ओळखण्यासाठी माहितीचा मूळ स्त्रोत शोधणे, उपलब्ध संदर्भ तपासणे, छायाचित्र किंवा व्हिडिओची सत्यता पडताळणे आणि संबंधित व्यक्ती अथवा संस्थेकडून माहितीची पुष्टी करणे आवश्यक असल्याचे वाघमोडे यांनी स्पष्ट केले. कार्यशाळेस मराठी पत्रकार परिषदेचे मार्गदर्शक आणि ज्येष्ठ पत्रकार एस. एम. देशमुख, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवराज काटकर, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील यांच्यासह राज्यातील विविध भागांतील ३०० हुन अधिक पत्रकार उपस्थित होते.

02 SEP 2026

सिंधुदुर्ग समाचार

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ग्रामीण भागातून शिक्षण घेत डॉ.विठ्ठल शिंदे यांची इंग्रजी विषयातून पीएच.डी.ला गवसणी



**सावंतवाडी/प्रतिनिधी :** येथील गोठोस, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग येथील रहिवासी आणि सध्या कोल्हापूर येथील वरिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्त्वावर प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले डॉ. विठ्ठल गंगाराम शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून इंग्रजी विषयातून पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. अत्यंत सर्वसामान्य परिस्थितीतून अविरत परिश्रम, जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर त्यांनी मिळविलेले हे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

डॉ. शिंदे यांनी शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी विभागातून "The Novels of Ruth Rendell: A Study in Mystery Fiction" या विषयावर पीएच.डी.चे संशोधन पूर्ण केले. त्यांच्या प्रबंधाचे मार्गदर्शन प्रा. डॉ. अद्वैत डी. जोशी यांनी केले आहे. डॉ. विठ्ठल शिंदे यांचे प्राथमिक शिक्षण गोठोस या ग्रामीण भागात झाले. त्यानंतर त्यांनी वाडोस हायस्कूल येथे माध्यमिक शिक्षण, माणगाव कॉलेज येथे उच्च माध्यमिक शिक्षण, तर रत्नागिरी येथे बी.एड. चे शिक्षण पूर्ण केले. शिक्षण घेत असतानाच त्यांनी आपल्या ध्येयासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवले. बी.एड. व SET-NET परीक्षा उत्तीर्ण करून त्यांनी अध्यापन क्षेत्रात आपली कारकीर्द सुरू केली.

गोवा विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ, KBP युनिव्हर्सिटी तसेच कोल्हापूर विद्यापीठात त्यांनी तासिका तत्त्वावर प्राध्यापक म्हणून काम केले असून, सध्या कोल्हापूर येथील वरिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्त्वावर प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. अध्यापनासोबतच संशोधनाची आवड जोपासत त्यांनी पीएच.डी.चे आव्हान यशस्वीपणे पूर्ण केले. ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेत जिद्द, सातत्य आणि अथक परिश्रमांच्या बळावर पीएच.डी.पर्यंत मजल मारणारे डॉ. विठ्ठल गंगाराम शिंदे यांचे हे यश गोठोससह संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2026

पुढारी

# दूरशिक्षण अभ्यासक्रम ऑनलाईन प्रवेशाची १० सप्टेंबरपर्यंत मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी सुरू असलेल्या विविध पदवी, पदव्युत्तर व ऑनलाईन अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची मुदत १० सप्टेंबरपर्यंत आहे. दूरशिक्षणांतर्गत बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व इतिहास), एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश सुरू आहेत. ऑनलाईन पद्धतीने एम.बी.ए., एम.कॉम. आणि एम.एस्सी. (गणित) अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

विद्यापीठाच्या ८९ अभ्यास केंद्रांमार्फत प्रवेशाची सुविधा उपलब्ध आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नियमित महाविद्यालय किंवा मुक्त विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना नियमानुसार दुहेरी पदवीची संधीही उपलब्ध आहे. इच्छुकांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून अथवा ऑनलाईन प्रवेश पोर्टलद्वारे प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2026

सिंधुदुर्ग समाचार

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने सेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापूर/प्रतिनिधी :

महाराष्ट्र व गोवा राज्यातील सहायक प्राध्यापक पदासाठी घेण्यात येणाऱ्या महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा सेट (SET) परीक्षेची प्रभावी तयारी करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने दि. १ सप्टेंबर ते ५ सप्टेंबर २०२६ दरम्यान सकाळी ११ ते सायं.६ या वेळेत सेट परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संचालक प्रा.डॉ.प्रतिभा पाटणकर यांनी दिली.

या कार्यशाळेचे उदघाटन प्र - कुलगुरू प्रा.डॉ.ज्योती जाधव करणार असून प्रमुख उपस्थितीत कुलसचिव डॉ. विलास शिंदे असणार असून अध्यक्ष स्थानी संचालक प्रा.डॉ. प्रतिभा पाटणकर उपस्थित असणार आहेत.

या कार्यशाळेत सेट (SET) परीक्षेचे स्वरूप, अभ्यासक्रम, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, प्रश्न सोडविण्याच्या पद्धती, वेळेचे नियोजन, संदर्भ साहित्याची निवड तसेच परीक्षेच्या दृष्टीने महत्त्वाच्या घटकांवर तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पेपर-१ मधील अध्यापन व संशोधन अभिवृत्ती, तर्कशक्ती, संवाद कौशल्य, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान यांसह विविध घटकांवर डॉ.कृष्णा पाटील, डॉ. शशिकांत अन्नदाते.डॉ.मारुती लोंढे व डॉ.शशिकांत शिंदे यांचे विशेष मार्गदर्शन मिळणार आहे.

त्याचबरोबर दुसऱ्या पेपरसाठी विषयनिहाय प्रा. डॉ.भारती पाटील व डॉ.सुचिता सुरगीहळी (राज्यशास्त्र), डॉ.दिग्विजय पाटील व डॉ.मोहन सोरटे (अर्थशास्त्र),प्रा. डॉ.संजय कोळेकर व डॉ.प्रल्हाद माने (समाजशास्त्र), प्रा. डॉ.सुरेश शिखरे व डॉ.हृषिकेश दळवी (इतिहास), डॉ.सुधीर लेंडवे व श्री.दीपक भादले (इंग्रजी), प्रा.डॉ.अनिल गवळी व डॉ.गजानन अपिने (मराठी), प्रा.डॉ.संदीप कदम व प्रा. डॉ.नरसिंह कदम (हिंदी),डॉ.कुलवीर कांबळे व डॉ.प्रवीण जाधव (एम.बी.ए.) डॉ.सागर वाळवेकर व डॉ.रोहित बसनाईक (वाणिज्य) श्री.बालाजी मोहिते व श्री.सौरभ स्वामी (गणित) आदी तज्ज्ञ मार्गदर्शक मार्गदर्शन करणार आहेत.

सेट(SET) परीक्षेत यश मिळविण्यासाठी नियोजनबद्ध अभ्यास, योग्य संदर्भ साहित्य आणि प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव महत्त्वाचा असतो. या उद्देशाने विद्यार्थ्यांना परीक्षेची शास्त्रीय तयारी करण्यासाठी कार्यशाळेचा निश्चितच लाभ होणार आहे. पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या तसेच सेट/नेट (SET/NET) परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी https://meet.google.com/hso-hmkt-oii या गुगल मीट लिंकला जावून सहभागी होवून या मार्गदर्शन कार्यशाळेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने संचालक डॉ.प्रतिभा पाटणकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 SEP 2026
सकाळ

# बी.एस्सी. जीवरसायनशास्त्र प्रवेशाला मुदतवाढ

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र अधिविभागाने २०२६-२७ पासून बारावीनंतर बी.एस्सी. (जीवरसायनशास्त्र) या विषयात पदवी अभ्यासक्रम सुरू केला आहे.

करिअरच्या आणि संशोधनाच्या संधी असणाऱ्या या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या अधिविभागात एम.एस्सी. (जीवरसायनशास्त्र) आणि पीएच.डी. (जीवरसायनशास्त्र) हे अभ्यासक्रम ४० वर्षांपासून प्रभावीपणे सुरू आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 SEP 2026

सिंधुदुर्ग समाचार

# बी.एस्सी. जीवरसायनशास्त्र प्रवेशासाठी 15 सप्टेंबरपर्यंत संधी

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र अधिविभागात सन २०२६-२७ पासून बारावीनंतर बी.एस्सी. (जीवरसायनशास्त्र) या विषयात पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. करिअरच्या आणि संशोधनाच्या अभिनव संधी असणाऱ्या या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी येत्या १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही माहिती अधिविभागाचे प्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी दिली आहे.

डॉ. सोनवणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, शिवाजी विद्यापीठाच्या जीवरसायनशास्त्र अधिविभागात एम.एस्सी. (जीवरसायनशास्त्र) आणि पीएच्.डी. (जीवरसायनशास्त्र) हे अभ्यासक्रम गेल्या ४० वर्षांपासून प्रभावीपणे सुरु आहेत. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून बी.एस्सी. (जीवरसायनशास्त्र) (एईडीपी) हा अभ्यासक्रम नव्याने सुरू करण्यात आला आहे. या अभ्यासक्रमाच्या पूर्ततेनंतर विद्यार्थ्यांना औषध निर्माण कंपन्या, शासनाच्या प्रयोगशाळांत ड्रग टेस्टिंग, फूड टेस्टिंग, शासकीय न्यायवैद्यक तसेच नमुना परीक्षण प्रयोगशाळा, माहिती तंत्रज्ञान कंपन्यामध्ये विविध आजारांवरील असणाऱ्या माहितीचे डेटा मायनिंग, डेटा विश्लेषण, पॅटर्न रिकग्निशन इत्यादी कामे, विविध दवाखान्यांत क्लिनिकल डेटा रिसर्च व एनालिसीस तसेच संशोधन व विकास क्षेत्रांत करिअरच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

या अभ्यासक्रमांतर्गत सहाव्या सेमिस्टरमध्ये घेण्यात येणाऱ्या औद्योगिक प्रशिक्षणांतर्गत रु. १२,५००/- इतका मासिक भत्ता देण्याचीही व्यवस्था आहे. तरी, इच्छुक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. तसेच, अधिक माहितीसाठी अधिविभागास भेट द्यावी अथवा दूरध्वनी क्र. ०२३१-२६०९१५३/ ८९८३३८१३२९ ईमेल पत्ता biochem@unishivaji.ac.in येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 SEP 2026

जनप्रवास



# भूगोल अभ्यासक्रम बदल कार्यशाळेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**जयसिंगपूर :** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आणि येथील श्रीमती गंगाबाई खिवराज घोडावत कन्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बी.ए. भाग ३ भूगोल विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमावरील एकदिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी गजकुमार माणगावे होते. कार्यशाळेच्या उद्घाटन सत्राचे स्वागत व प्रास्ताविक प्रा. योगेश बदामे यांनी केले. यावेळी भूगोल विषयाच्या सुधारित अभ्यासक्रमावरील पुस्तकाचा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी भोगावती महाविद्यालयाचे प्रा. डॉ. एन. एम. पाटील यांचे बीजभाषण झाले. उद्घाटन सत्राच्या अध्यक्षस्थानी मा. गजकुमार माणगावे होते. प्रा. निलिमा खाडे यांनी आभार मानले.

0 2 SEP 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



ज्ञान-विज्ञान

# विज्ञानातील एकलव्य फॅराडे!

डॉ. व्ही.एन. शिंदे

**गरिबी ज्ञानार्जनाच्या आड पूर्वीही येत नव्हती आणि आज तर नाहीच नाही. आज अनेक शासकीय योजनांतून शिक्षणासाठी सहाय्य मिळते. मात्र, पूर्वी अशा योजना नसताना आणि कोणी मदतीला आलेले नसताना, केवळ अंतरीची ओढ असल्याने सहावी शिकलेला मुलगा पुढे रॉयल सोसायटीमध्ये गेला. इतका मोठा झाला की जगाच्या इतिहासात त्याचे नाव अजरामर झाले. धारिता म्हणजेच कॅपॅसिटन्स या भौतिक राशीच्या एककाच्या रूपाने त्याने अढळ स्थान प्राप्त केले. दहावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्यालाही त्याचे नाव माहीत आहे. आईनस्टाईनलाही या संशोधकाचा फोटो आपल्या दालनात लावावा वाटावे, असा संशोधक म्हणजे मायकल फॅराडे.**

लंडनमध्ये इंग्लंडमधील नेविंग्टन बट भागातून वर्षभरापूर्वीच स्थलांतरीत झालेल्या, अत्यंत गरीब कुटुंबात मायकल यांचा २२ सप्टेंबर १७९१ रोजी जन्म झाला. ते चार भावंडातील तिसरे अपत्य. त्यांचे वडील जेम्स हे एका कार्यशाळेत लोहाराचे काम करत. घरच्या गरिबीमुळे मायकलना अत्यंत सुमार दर्जाच्या शाळेत घातले. तेथे केवळ अक्षरओळख झाली. त्यानंतर सहावीत असतानाच त्यांची शाळा सुटली. केवळ तेरा वर्षांचे असताना, एका पुस्तकबांधणीच्या दुकानात उमेदवारी सुरू केली. स्थानिक पुस्तक विक्रेते जॉर्ज रिबू यांच्या मालकीचे ते दुकान होते. पुस्तकबांधणी करता करता, त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली. रिबूही त्यांच्या वाचनाच्या आवडी आड आले नाहीत. उलट ते मायकलना वाचनासाठी प्रोत्साहन देत राहिले. त्याचबरोबर ते दररोज कामावरून परतताना अनेक मान्यवरांच्या घरी पुस्तके आणि वर्तमानपत्रे पोहोचवत. नंतर दुसऱ्या दिवशी कामावर येताना परत घेऊन येत. विशेषतः विज्ञानाची पुस्तके वाचनावर मायकल यांचा भर होता. त्यातही रसायनशास्त्राकडे त्यांचे मन आकर्षित झाले. मायकल आयुष्याच्या अखेरपर्यंत या जॉर्ज रिबू यांचे ऋण मानत होते.

मायकल ज्यांच्या घरी पुस्तके आणि वर्तमानपत्रे पोहोचवत, त्यातील एक गृहस्थ होते विल्यम डान्स. त्यांना मायकल यांच्या वाचनाची माहिती होती. पूर्वी थोर संशोधकांची व्याख्याने तिकिटे ठेऊन आयोजित करत. अशा व्याख्यानाचे काही मान्यवरांना मोफत पास देत. एकदा त्यांच्याकडे हंफ्रे डेव्हींच्या व्याख्यानाचे असेच पास आले. मात्र, त्यांची प्रकृती बिघडल्याने ते जाऊ शकणार नव्हंते, त्यामुळे त्यांनी ते पास मायकलना दिले आणि मायकलना जाण्यास सांगितले. तेथे जाऊन काय करायचे हे माहीत नसलेले मायकल एक वही घेऊन गेले. एखाद्या आदर्श विद्यार्थ्यासारख्या, व्याख्यानाच्या नोटस त्यांनी वहीत लिहून काढल्या. लोकाग्रहास्तव हंफ्रे डेव्ही यांची व्याख्याने आणखी दोन दिवस वाढवण्यात आली. मायकलना व्याख्यानाची तिकिटे खरेदी करणे शक्यच नव्हते. मात्र, विल्यम डान्संनी ही तिकिटेही मायकलना दिली. सहा व्याख्यानांच्या नोटसनी मायकल यांची तीनशे पानांची वही भरून गेली. या वहीचे काय करायचे असा मायकल यांच्यासमोर प्रश्न पडला. त्यांनी सरळ ती वही हंफ्रे डेव्हींना पाठवून दिली. डेव्ही यांना ती वही पाहून मोठे आश्चर्य वाटले.

लेख ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

त्याच काळात डेव्ही यांचा प्रयोगावेळी अपघात झाला होता. त्यामध्ये त्यांच्या डोळ्याला इजा पोहोचली, त्यामुळे रॉयल सोसायटीने डेव्ही यांना एक सहाय्यक नेमण्यास परवानगी दिली होती. त्याचवेळी मायकल यांनी पाठवलेली वही डेव्हींना मिळाली. आपल्या सहा व्याख्यानाच्या तीनशे पानांच्या नोटस काढणाऱ्या मुलासच आपला सहाय्यक नेमण्याचे डेव्हींनी ठरवले. त्यांनी मायकलना बोलावून घेतले आणि आपला रसायन सहाय्यक म्हणून नेमले. आजवर एकलव्याप्रमाणे विज्ञान अभ्यासणाऱ्या मायकल यांच्या आयुष्याला वेगळे वळण मिळाले. पुस्तकांची बांधणी करणारा मुलगा अचानक जगातील सर्वांत प्रतिष्ठित संस्थेतील, त्या काळातील सर्वांत मोठ्या संशोधकाच्या प्रयोगशाळेत काम करू लागला. १ मार्च १८१३ पासून ते रॉयल सोसायटीत रूजू झाले.

लगेचच हंफ्रे डेव्ही यांना युरोप दौऱ्यासाठी परवानगी देण्यात आली. या काळात त्यांना एक सहाय्यक आणि एक शिपाई बरोबर नेण्याची परवानगी देण्यात आली. मात्र, त्यांच्याबरोबर जाण्यास कोणीच शिपाई तयार नव्हता. अखेर मायकल यांनीच दोन्ही जबाबदाऱ्या पार पाडाव्यात असे ठरले आणि प्रवास सुरू झाला. डेव्ही मायकलना सन्मानाने वागवत, मात्र त्यांच्या पत्नीला एका शिपायाला बरोबरीने वागवणे रूचत नव्हते. त्या मायकलना बोगीच्या बाहेर बसायला लावत. अत्यंत अवमानकारक वागणूक देत. त्या इतका अपमान करत की दौरा अर्ध्यावर सोडावा, विज्ञानाचाही नाद सोडावा, असा मायकल यांच्या मनात अनेकदा विचार आला. मात्र, या दौऱ्यात अनेक मान्यवर संशोधकांना भेटण्याची संधी मिळणार असल्याने त्यांनी अपमानाचे विष पचवत दौरा पूर्ण केला.

या अठरा महिन्याच्या दौऱ्यात त्यांनी फ्रान्स, इटली, स्वित्झर्लंड आणि जर्मनीमधील अनेक प्रयोगशाळांना भेटी दिल्या. या दौऱ्यात आंद्रे मारी ॲम्पिअर, चार्ल्स गास्पार्ड, आर्थर ऑगस्ट डी ला राईव्ह, आलेस्सांद्रो व्होल्टा या संशोधकांच्या प्रयोगशाळा पाहता आल्या. त्यांच्याशी चर्चा करता आली. त्याचवेळी नेपोलियनच्या साम्राज्याचा अंत सुरू झाला आणि त्यांना दौरा अर्धवट सोडावा लागला. या काळात जोसेफ प्रिस्टले यांनी त्यांना सर्वाधिक प्रभावित्त केले. प्रिस्टले यांच्यापासून खऱ्या अर्थाने मायकलना संशोधनाची प्रेरणा मिळाली. अपमानाच्या कटू घोटांसोबत मायकलना ही मोठी भेट मिळाली.

त्यांनी स्वतंत्र संशोधनही सुरू केले. क्लोरिनच्या अनेक संयुगांचा शोध लावला. कार्बन हेक्झाक्लोराईड आणि कार्बन टेट्राक्लोराईड ही दोन संयुगे शोधली. त्यांनी वायुच्या विसरणावरही मोठे संशोधन केले. चुंबकीय काचेचा शोध लावला. प्रयोगशाळेत वापरण्यासाठी सुरक्षित बर्नर बनवले. तसेच क्लोरीनचे द्रवीकरण करण्याचे तंत्रही शोधले. वायूरूप असलेल्या पदार्थांचा उत्कलनांक कमी असतो आणि त्यांचे तापमान आणखी कमी केल्यास त्यांचे घनरूप मिळू शकते हेही मायकल यांनी सांगितले. त्यांनी विद्युत अपघटनाचा सिद्धांत मांडला. ॲनोड, कॅथोड, इलेक्ट्रोड, आयन हे शब्द त्यांनीच प्रथम वापरले. सुवर्ण कलिलांचा अभ्यास करून नॅनोपार्टिकल्सचा शोध लावला.

त्यांनी विद्युत-चुंबकीय क्षेत्रातही मोठे संशोधन केले. मात्र, या क्षेत्रात संशोधन करण्यास त्यांच्यावर दोन वर्षांसाठी बंदी घालण्यात आली होती. डेव्ही यांच्या कल्पनेतील एकादिष्ट विद्युत धारेवर चालणारी मोटर मायकल यांनी बनवली. मात्र, या विषयीच्या शोधनिबंधात डेव्हींचा उल्लेख न केल्याने ही बंदी घालण्यात आली. डेव्हींच्या निधनानंतर त्यांनी विद्युत-चुंबकीय प्रवर्तनाचा सिद्धांत मांडला. या नियमावरच मॅक्सवेल यांचे एक सूत्र आधारित आहे. त्यांनी प्राणी विद्युत, विद्युत अपघटन, विद्युत निर्मिती, विद्युत आणि चुंबकीय बले इत्यादींचा अभ्यास केला. प्रकाश किरणांना चुंबकीय काचांच्या सहाय्याने फिरवले. आपल्या संशोधनाने मानवाचे कष्ट कमी करण्यासाठी अनेक यंत्रांचे तंत्रज्ञान विकसित झाले. गरिबीने मायकल यांचे शिक्षण थांबवले, ज्ञानप्राप्ती मात्र रोखता आली नाही.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००